NEHRU BAL PUSTAKALAYA

# पार्सलमधून बॉम्ब?

द्रोणवीर कोहली

अनुवाद

विद्या बापट





नेहरू बाल पुस्तकालय

# पार्सलमधून बॉम्ब?

द्रोणवीर कोहली

अनुवाद

विद्या बापट

चित्रे

जगदीश जोशी

एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



ISBN 81-237-3533-2

2001 *(शके 1923)*

मूळ © द्रोणवीर कोहली, 1994

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2001

**रु. 13.00**

Dak Babu Ka Parcel *(Marathi)*

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क नवी दिल्ली 110 016 यांनी प्रकाशित केले.

# एक

हिमाचल प्रदेशाच्या कुलू घाटीतल्या डोंगरात एक बऱ्यापैकी गाव आहे. त्याचे नाव आहे पनारसा. पनारसा टपाल कचेरीचे पोस्टमास्तर होते रामधन. त्यांचे नाव रामधन होते तरी लोक त्यांना प्रेमाने 'डाकबाबू' असेच म्हणत. डाकबाबूंचे वय असेल पन्नास पंचावन्न. ते शरीराने जरी किडकिडीत असले तरी सतत उत्साही आणि तरतरीत असायचे. शिवाय स्वभावाने अगदी मनमिळाऊ. सगळ्यांशी अगदी गोड बोलायचे, नम्रतेने वागायचे.

डाकबाबूंनी मोठ्या शहरातून मुद्दाम आपली बदली इथे करवून घेतली होती. म्हणून आता ते इथे राहत होते. पनारसामध्ये त्यांचा जीव असा रमला होता की ते तिथलेच होऊन गेले होते.

तिथे शहरात होता रात्रंदिवस कोलाहल! त्या भयंकर गर्दीगोंधळात त्यांचा जीव अगदी गुदमरून जाई. पण पनारशाला आल्यावर डाकबाबूंना अगदी शांत वाटले. ती गडबड नाही-गोंधळ नाही. तो आरडा नाही की ओरडा नाही. चारी बाजूला उंच उंच डोंगर—जणुकाही बाहेरच्या गोंधळाला बाहेरच थांबविण्यासाठी ते तिथे उभे होते. शिवाय तिथे आकाशाशी गप्पा मारणारे मोठे मोठे वृक्ष होते. हिरवेगार शेतमळे होते. फळाफुलांनी बहरलेले बाग मळे होते. शुद्ध स्वच्छ हवा होती. व्यास नदीचे झुळुझुळु वाहणारे निर्मळ पाणी होते. आणि सगळ्यात छान



म्हणजे इथले लोक! कशी साधीसुधी, भोळी भाबडी माणसं होती इथली!

या सगळ्यांनी डाकबाबूंचे मन जिंकून घेतले होते. आणि आता पनारसामध्ये ते सुखशांतीचे जीवन जगत होते.

# दोन

एक दिवस काय झाले—डाकबाबूंना टपालात एक पार्सल मिळाले, त्यावर त्यांचे स्वतःचे नाव पत्ता वगैरे काही नव्हते. फक्त पत्ता लिहायच्या जागी एक वाक्य मात्र लिहिले होते, "कुलू येथील पनारसा गावाच्या पोस्टमास्तरांना देणे."

पार्सल दिल्लीहून आले होते. पार्सलच्या एका कोपऱ्यात पाठविणाऱ्याचे नाव नि पत्ता व्यवस्थित लिहिला होता. डाकबाबूंनी आपल्या जाड काचांचा चष्मा डोळ्यांवर ठाकठीक बसवून ते वाचले. नव्या दिल्लीतला कोणी सुरेशकुमार होता आणि तो अलकनंदा नावाच्या वसाहतीत राहणारा होता.

पार्सल उलटसुलट करीत डाकबाबू थोडावेळ विचारात पडले, 'दिल्लीत तर आपलं कोणी राहत नाही. आपला कोणी दोस्तही राहत नाही तिथं. सुरेश नावाचा एकही माणूस आपल्या ओळखीचा नाही. आणि तो मला ओळखत असता तर माझ्याच नावानं त्यानं पार्सल नसतं का पाठवलं?'

डाकबाबू चांगलेच गोंधळात पडले. आपली गोल टोपी काढून पुन्हा पुन्हा ते डोके खाजवत राहिले. खेडेगावातली टपाल कचेरी छोटीशीच असते. त्यांच्या ऑफिसात फक्त एक पोस्टमन कामाला होता. त्याचे नाव केशव. यावेळी केशव आपल्या खुर्चीवर बसून नेहमीप्रमाणे पेंगत होता. आता कचेरीत दुसरे कोणीही नव्हते.




केशवला पेंगताना पाहून डाकबाबू चिडले. डाकबाबू अगदी किडकिडीत, बारकुडे आणि केशव एकदम ताडमाड आणि आडमाप. ही पण एक गंमतच होती. एवढा आडदांड केशव पण होता अगदी सुस्त. बस्स! बसला की बसला.

खरे तर वयाने तो डाकबाबूंच्या निम्याने होता. पण त्यांच्यातली अर्धी तडफही त्याच्याजवळ नव्हती. सदा न् कदा आपला पेंगतोय, पेंगतोय!

या पार्सलमुळे डाकबाबू आधीच हैराण झाले होते. त्यात केशवला असे पेंगताना पाहून ते उखडलेच. आणि जोरात ओरडले, "ए ऽ, केशव!"

"काय, सर?" दचकून गडबडीने उठताना केशव कोलमडणारच होता-पण सावरला.

केशव ज्या खुर्चीवर बसायचा तिचे तीन पाय लाकडाचे होते अन् चवथ्या पायाच्या जागी विटा रचल्या होत्या. तीही एक गंमतच आहे. काय झाले, एक दिवस केशव खुर्चीवर बसल्या बसल्या मोठमोठ्याने हसत होता. खुर्ची बिचारी



जुनी पुराणी, आधीच मोडकळीला आलेली, त्यात लठ्ठंभारती केशवच्या शरीराच्या हिसक्यांनी करकरत एकदम कोलमडली आणि केशवला घेऊन जमिनीवर लवंडली, केशववर ओरखडा सुद्धा उठला नाही. खुर्ची मात्र एका पायाने लंगडी झाली. तेव्हापासून त्या चौथ्या पायाच्या जागी विटा रचून केशवने आपले काम भागविले होते. अतिशय काळजीपूर्वक तो खुर्चीवर बसायचा नि उठायचा. न जाणे विटा घसरायच्या आणि तो पुन्हा जमीनदोस्त होऊन पडायचा, ही भीती.

डाकबाबूंची गर्जना ऐकून केशव किलकिल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे बघू लागला.

"दिवसभर पेंगतोय लेकाचा, बूड हालवणं सुद्धा जमत नाहीये—खा खा खायचं कशाला एवढं? बकासुराचा भाऊ कुठला!" डाकबाबू तावदारले.

"होय, सर."

"होय सर, काय, होय सर?" नाक डोळे उडवून डाकबाबूंनी त्याला वेडावून दाखविले. पण त्याचवेळी त्याची अवस्था बघून त्यांना दयाही आली. म्हणाले, "अरे बाबा, आधी डोळे उघड आणि हे पार्सल आण बरं उघडून जरा."

केशव काळजीपूर्वक उठला. त्याचे पोट तर खरेच एवढे मोठे होते की उभे राहिल्यावर त्याला स्वतःचे गुडघे, पाय दिसायचेच नाहीत. खाकी पँटवर तो चांगला पंधरा सेंटीमीटर रुंदीचा चामडी पट्टा आवळायचा तरी सुद्धा पँट खाली घसरायचीच. सारखी सारखी वर खेचायला लागायची.

आता डाकबाबू रागावले म्हटल्यावर आपली घसरणारी पँट सावरीत शक्य तितक्या लगबगीने तो डाकबाबूंजवळ आला आणि पडलेल्या चेहऱ्याने तो आपल्या टेबलाकडे गेला.

त्याला घाई करत डाकबाबू अधीर होऊन ओरडले, "अरे बाबा, आता लवकर उघड ते पार्सल. अजून सारं टपाल वाटायचं पडलंय. आता तू जाणार केव्हा, येणार केव्हा?"

डाकबाबू केशवला रागवायचे हे खरे असले तरी त्याच्यावर ते तेवढीच मायाही करायचे. म्हणूनच केशवही त्यांचे रागावणे मनावर घेत नसे. हं ऽ, लहान मुलासारखा गाल फुगवून 'हुप्प' होऊन मात्र बसायचा. आता तशीच अवस्था होती. 'हुप्प' होऊनच पार्सल उघडणे चालले होते.

त्याने पार्सलवर चढवलेले कापड कापून बाजूला केले. आत एक पुठ्ठ्याचा डबा होता. तो त्याने उघडला आणि दचकून एकदम तो मागेच सरला.

डाकबाबूंचे लक्ष तिकडेच होते. केशवला एवढे दचकलेले पाहून ते म्हणाले, "अरे काय, साप विंचू आहे की काय त्यात? एवढं काय झालं दचकायला?"

केशव डोळे फाडून बघत राहिला होता. काहीतरी बोलायचं होतं. पण



तोंडून शब्दच उमटत नव्हता. एकदाचा शेवटी तोंडातून शब्द फुटला—"डा ऽ डा क बाबू ऽ".

त्याची अवस्था पाहून डाकबाबूही आता थोडे घाबरले, उठून उभे राहिले अन् म्हणाले, "अरे, झा ऽ लं काय?" ते भराभरा चालत केशवजवळ आले. अजूनही केशव घाबरलेलाच होता. नुसता भीतीने बघतच राहिला होता. डाकबाबूंनी जवळ जाऊन डबा पाहिला आणि त्यांची मतीही गुंग होऊन गेली. डब्यात साप, विंचू असलं काही नव्हतं. त्यात होता एक गोल चपटासा दगड!

डाकबाबू विस्मयाने बघत राहिले. आणि केशव? अंधारात सापासारख्या दिसणाऱ्या दोरीला पाहून माणसाची जशी गाळण उडते तसा तो भयाने थरथर कापत होता.

थोडावेळ डाकबाबूही चकित होऊन पाहत राहिले. पण मग लगेच त्यांच्या लक्षात आलं की ही कोणीतरी चेष्टा केलीय. नाहीतर अशा तऱ्हेने पार्सलमधून दगड कोण पाठवायला बसलंय?

त्यांनी गुपचूप आपला डबा उचलला आणि आपल्या खुर्चीत येऊन बसले. अन् केशवला म्हणाले, "हत् लेका, माणूस आहेस का कोण? एक दगड पाहून एवढा घाबरलास? जा, चटकन टपाल वाटून ये. आधीच उशीर झालाय. आणखी उशीर झाला तर सारा गाव जमा होईल इथं."

केशव चुपचाप थैलीत टपाल भरायला लागला. मधून मधून हळूच चोरून डाकबाबूंकडे बघत होता. बेचैन झाला होता. घाबरला पण होता. "हे कसलं विचित्र पार्सल? दगड भरलेलं?"

शेवटी शाळेत जायला नाखूष असलेला मुलगा जसे नाराजीने दप्तर खांद्याला अडकवतो तशी त्याने थैली खांद्याला लटकावली. वाकडी टोपी सरळ केली. कानावर बॉलपेन अडकवलन्—घसरणारी पँट वर खेचलीन् आणि अजूनही 'हुप्प' असलेल्या गालांसह तो बाहेर पडला.

## तीन

आता मागे कचेरीत डाकबाबू एकटेच राहिले. त्यांनी डब्यातून दगड काढला. तीन चार सेंटीमीटर व्यासाचा राखाडी रंगाचा दगड होता तो! बस, दगडासारखा दगड. काही विशेष नव्हते त्यात. डोंगरातून वाहणाऱ्या नदीत सापडतात तसला. एका बाजूला थोडा चपटा होता इतकेच.

दगड टेबलावर ठेवून डाकबाबूंनी डब्यात पाहिले. त्यात एक कागद दिसला. तो बाहेर काढून पाहिले तर ती एक चिठ्ठी होती लिहिलेली. त्यांनी ती वाचली. खाली लिहिणाऱ्याचे नाव होते—सुरेश. अक्षरावरून ती एखाद्या छोट्या मुलाने लिहिली असावी असे वाटत होते.

डाकबाबू गोंधळले आणि झटकन लक्ष देऊन ती चिठ्ठी वाचायला लागले.

*डाकबाबू साहेब,*

*नमस्कार. मला माहीत आहे, या माझ्या पार्सलमधला दगड पाहून आपल्याला खूप आश्चर्य वाटलं असेल. कदाचित भीतीही वाटली असेल...*

डाकबाबूंनी चिठ्ठीवरून नजर उचलून वर पाहिले आणि दात ओठ खात म्हणाले, “बेट्या, मला काय आश्चर्य वाटलं ते वाटलं. पण तुझ्या त्या दगडानं केशवचा घाबरून प्राणच जायची वेळ आली होती.”

ते पुन्हा चिठ्ठी वाचू लागले. पुढे लिहिले होते :



''माझं नाव वाचूनही तुम्ही गोंधळात पडला असाल. मनात म्हणाल पार्सल पाठवणारा हा सुरेश कोण? म्हणून आधी मी माझी ओळख करून देतो आणि माझा हेतूही स्पष्ट करतो.

माझं नाव सुरेश कुमार. मी दिल्लीला राहतो. आठव्या इयत्तेत शिकतो. मी माझ्या आईवडिलांचा एकुलता एक मुलगा आहे. माझे वडील व्यापारी आहेत. काही दिवसांपूर्वी आम्ही कुलू मनालीला सहलीला गेलो होतो. येता येता

*आपल्या गावावरून आलो. तिथल्याच नदीच्या काठावरून मी हा दगड उचलून आणला होता.*

*आता हा दगड पुन्हा त्याच जागी नेऊन ठेवण्याची माझी इच्छा आहे. म्हणून मी तो आपल्याकडे पाठवला आहे. आपण कृपा करून तो दगड नदीच्या काठी ठेवून यावे. कुठे ठेवायचा ती जागाही सांगतो.*

*आपल्या कचेरीच्या थोडं खालच्या अंगाला भजी विकणाऱ्याची एक टपरी आहे ना, त्याच्या बाजूने जो रस्ता नदीकडे जातो त्या रस्त्यानं जायचं. नदीच्या काठावरच दोन उंच उंच शिळा जवळ जवळ उभ्या असलेल्या दिसतील. त्यांच्यामध्ये असले खूप दगड पडले आहेत. आपण कृपा करून हा दगड त्या दोन शिळांच्या मधल्या इतर दगडात ठेवून यावे. आपल्याला त्रास देतोय. पण माझी खात्री आहे की या एका लहान मुलाचा हट्ट आपण जरूर पुरवाल. बस, एवढीच प्रार्थना आहे. आपल्याला देत असलेल्या त्रासाबद्दल आपण मला क्षमा कराल अशी आशा आहे.*

*आपला नम्र,*
*सुरेश कुमार*

चिठ्ठी वाचून डाकबाबू आ वासून बघतच राहिले. त्यांना आश्चर्यच वाटले. बसल्या बसल्या विचार करत राहिले, ‘अरे, हा कसला विचित्र हट्ट. का कोणी गंमत चालविलीय?’ हा विचार मनात येताच त्यांनी चिठ्ठी टेबलावर ठेवली आणि तोच दगड दडपण म्हणून तिच्यावर ठेवला. ‘कोणीतरी वेडपट दिसतोय झालं. कुठल्यातरी वेडपटानं ही टवाळी चालवलीय. माझा ‘मामा’ करायचा विचार दिसतोय.’

बाहेर कोणाची तरी चाहूल लागली. डाकबाबूंनी दचकून पाहिले. दरवाजात बलराम उभा होता. बलराम-अकरा बारा वर्षाचा मुलगा! त्यांच्या घराजवळच राहायचा तो.

डाकबाबूंनी ओळखले, बलराम कशाला आलाय. आपल्या भावाच्या मनीऑर्डरबद्दल विचारायला आला असणार. बलरामचा मोठा भाऊ शहरात नोकरी करायचा. काही दिवसांपूर्वी गावी आला होता आणि बलरामला सांगून गेला होता की चांगले गुण मिळवून पास झालास तर वीस रुपयांची मनीऑर्डर पाठवीन. पण दोन तीन महिने झाले. अजून मनीऑर्डर आली नव्हती. बिचारा बलराम दर एक दोन दिवसांनी चौकशी करायला यायचा आणि डाकबाबू त्याची समजूत घालून त्याला परत पाठवायचे. पण आत्ता मात्र बलराम दिसताच त्यांचा पारा चढला. खरेतर डाकबाबू कधीच एवढे रागवायचे नाहीत. पण आत्ता मात्र तो दगड आणि ती चिठ्ठी यामुळे ते आधीच वैतागले होते. ते एकदम चिडून ओरडले, "आलास का परत? अरे बाबा, तुला किती वेळा सांगितलं की मनीऑर्डर आली की केशव तुझ्या घरी आणून देईल. इथं काय कोणी खाणार आहे का तुझी मनीऑर्डर? रोज थोबाड घेऊन येतोस. चल निघ - काही नाही आली मनीऑर्डर बिनिऑर्डर."

बलराम बिचारा एकदम घाबरला. तिथल्या तिथे खुंटला. त्याचे पाऊल पुढे पडेना की मागे. त्याला समजेच ना की आज काय झालंय डाकबाबूंना ते. एरवी ते कधीच असं बोलायचे नाहीत. रागवायचे नाहीत.

"जा बाबा, जा," डाकबाबू पुन्हा ओरडले. मग मात्र बलराम माघारा वळला. त्याचे डोळे डबडबले होते.

डाकबाबूंना पश्चाताप झाला. त्यांना वाटले, 'उगीच रागावलो बिचाऱ्याला! त्याचा यात काय दोष? मनीऑर्डरबद्दलच तर विचारायला आला होता, बिचारा! किती दिवसांपासून वाट बघतोय. रोजच्यासारखं आजही समजूत घालून परत पाठवलं असतं तर त्याला एवढं वाईट वाटलं नसतं. बोलावून समजावतोच त्याला.'

असा विचार करून ते उठले. भराभरा दरवाजापर्यंत आले. बलराम अजून लांब गेला नव्हता. डाकबाबूंनी हाक मारली, "ए ऽ इकडे ये." बलराम एकदम

थबकला. पुन्हा डाकबाबू ओरडले तसा दबत्या पावलांनी परत आला. तोंड अगदी रडवेले झाले होते.

डाकबाबूंचे मन द्रवले. पण वरून खोट्या रागाने म्हणाले, ''बस्, झालं का? नाही आली मनीऑर्डर की चालले रडत घरी. लेका, तुला रोज सांगतोय की




मनीऑर्डर आली की पाठवीन तुझ्या घरी लगेच. घे, तुला पैसे हवेत का? हे पाच रुपये घे, आण तुला काय वही पुस्तक आणायचं असेल ते. मनीऑर्डर आली की परत कर पैसे," असं म्हणून त्यांनी खिशातून पाचाची नोट काढली.

पण बलराम साफ नको म्हणाला. अन् हळूच पुटपुटला, "नाही डाकबाबू, दादा पाठवील तेच पैसे मी घेईन—दुसऱ्या कोणाकडून नाही घेणार."

डाकबाबू त्याच्याकडे टकमक पाहतच राहिले. मग मात्र त्यांना अगदी गहिवरून आले. म्हणाले, "बरं, बरं, जा, मनीऑर्डर आली की स्वतः येऊन सांगीन तुला, जा आता."

बलराम गेला आणि डाकबाबू आपल्या खुर्चीवर येऊन बसले. त्यांचं डोकं एकदम ठणकायला लागलं. त्यांनी टेबलावरचे कागद जरा ठाकठीक केले. पुन्हा एकदा त्या दगडाखालची ती चिठ्ठी काढून दुसऱ्यांदा वाचली. वाचता वाचता त्यांना काही उमगेनासे झाले. ते पुरे वैतागले. म्हणाले, "दिल्लीच्या या भामट्यानं चांगलीच फिरकी घेतलीय माझी."




## चार

गावात सगळेजण केशव पोस्टमनची चेष्टा करायचे. टवाळ पोरे तर तो दिसताच त्याच्या मागेच लागायची. पण केशव त्यांची चेष्टा कधी मनावर नाही घ्यायचा.

त्या दिवशी केशव आपल्या ठेंगण्याठुसक्या बारकुड्या बायकोला घेऊन बाजाराला चालला होता. बरोबर एवढी एवढी तीन मुलं पण होती. एकतर अगदी छोटं होतं. दांडगा दुंडगा केशव, त्याची एवढीशी बायको आणि बारकी बारकी मुलं, अगदी मजेशीर दृश्य होतं ते! एखादे भलेमोठे अस्वल, त्याच्याबरोबर गरीबडी कोंबडी आणि तिची चिल्लीपिल्ली भटकायला बाहेर पडावीत तसे दिसत होते. पाहून पाहून सगळेजण हसत होते. पण केशवला काहीच वाटत नव्हते. उलट तोही त्यांच्या हसण्यात सामील होत होता. त्याची बायको आणि मुलं सुद्धा खुदूखुदू हसत होती.

पण आज केशव जरा काळजीत होता. ते पार्सल पाहिल्यापासून त्याचे चित्त थाऱ्यावर नव्हते. त्यात आणि डाकबाबूंनी त्याला चांगले फैलावर घेतले होते. त्यामुळे आज त्याला ही चेष्टा मस्करी गोड वाटत नव्हती. तशात एक पोरगा त्यांच्या जोडीने चालत चालत त्याच्यापुढे वेडीवाकडी तोंडे करायला लागला तेव्हा त्याला केशवने चांगलेच फटकारले. त्यात पुढे आणखी दुसरं पोरटं आलं



आणि चिकटून चालत विचारायला लागलं, "ओ ऽ पोस्टमनदादा, तुमच्या या थैलीत आमचं पत्र आहे का एखादं?"

केशवचे डोकेच फिरले. आपले पोट संभाळून जेवढे वाकता येईल तेव्हढे वाकून त्या मुलाकडे पाहून म्हणाला, "हो, हो, आहे ना. तुझी सासू मेल्याचं पत्र आलंय, देऊ?"

पोराचा चेहरा एकदम पडला आणि ढुंगणाला पाय लावून त्याने धूम ठोकली.

सगळी जणे खो खो हसत होती. इकडे केशवची बडबड चाललीच होती. "गांवढळ लेकाचे! या गावातले लोक मुलांना काही शिकवतात की नाही?

लहान नाही मोठं नाही. कुणाचीही टिंगल करत सुटतात. पहा तर खरं, आहे एवढासा मच्छर पण रुबाब केवढा!–कोणीही आपलं येऊन विचारतंय–तुमच्या थैलीत आमचं पत्र आहे का? हट, पाजी कुठला."

थोडा पुढे गेला तर आणखी एका पोराने टवाळी आरंभली. केशवला लगटून चालत विचारतो कसा, "ओ ऽ पोस्टमनदादा, तुमच्या पोटात काय भरलंय?" असा प्रश्न खरेतर लोक त्याला नेहमीच विचारायचे. केशव जर नेहमीसारखा चांगल्या मूडमध्ये असता तर दोन्ही खिसे चाचपत म्हणाला असता, "मिठाई भरलेय लेका, मिठाई. रोज शिरापुरी, जिलब्या, रसमलाई यांचा नैवेद्य असतो ना मला–"

पण आजची गोष्ट वेगळी होती. केशव आधीच चिडलेला होता. तो एकदम उखडून म्हणाला, "ये, ये दाखवतो, या पोटात साऱ्या जगातली घाण, केर कचरा भरून ठेवलाय, बघायचाय? हॅट् ऽ आता पळतोस की–"

पोराने केव्हाच सूबाल्या केला. "बदमाश माकडं," त्याच्या मागे पाय आपटून केशव ओरडला, "अरे, हा ऽ ट."

केशवच्या पोटात शिरापुरी होती की केरकचरा तोच जाणे. पण एकमात्र खरे. ऐकलेली कोणतीच गोष्ट त्याच्या पोटात फार काळ रहायची नाही. कुठून काही बातमी कानावर आली की लगेच याच्या पोटात गडबड व्हायला लागायची आणि एकदाची ती ओकून टाकल्याशिवाय त्याला चैन म्हणून पडायची नाही.

आज तर नवलच घडले होते. खुद्द डाकबाबूंना पार्सलमधून दगड येणे ही काय लहान सहान घटना होती? केशवच्या पोटात ज्यामच गडबडत होते. आता ही गोष्ट दोन चार लोकांना सांगितल्याशिवाय काही ते थांबणार नव्हते.

शाळेत टपाल द्यायला गेल्यावर तर त्याला अगदी राहवलेच नाही. हेडमास्तरांच्या हातात टपाल देता देता एखादी गुप्त गोष्ट सांगायला जावे अशा अविर्भावात त्याने हलकेच हाक मारली, "पांडे सर,–"

हेडमास्तरांचे नाव मनोहर पांडे होते. त्यांनी केशवकडे पाहिले. त्याचा चेहरा कसानुसा झाला होता. ते म्हणाले, "काय रे, काय झालं केशव?"

केशवने इकडे तिकडे पाहिले, आसपास कोणी नव्हते. तेव्हा निर्धास्त होऊन थोडा पुढे झुकून तो पांडे सरांच्या कानातच सांगू लागला, "पांडे सर, कोणाला सांगू नका, पण डाकबाबूंचं काही खरं नाही. अहो, ज्याम वैतागले आहेत ते."

"का? काय झालं?" हेडमास्तरांनी आश्चर्याने विचारले. "अं ऽ हं," अगदी वाईट तोंड करून केशवने आपली जाडजूड मान चांगली तीन चार वेळा वर खाली हालवलीन् अन् मग थेट पांडे सरांच्या डोळ्याला डोळा भिडवून खास आवाजात म्हणाला, "काय सांगायचं? अहो, डाकबाबूंना आज पार्सलमधून चक्क एक दगड आलाय-दगड."

पांडे सरांना काही उमजले नाही. ते म्हणाले, "काय म्हणतो आहेस? मला काही कळलं नाही."

"अहो, खरंच," पुन्हा मघासारखी मुंडी हालवत केशव म्हणाला, "अहो, कोणीतरी हा एवढा मोठा दगड पार्सलमधून पाठवलाय."

"काय, सांगतोस काय?" पांडे मास्तर डोळे विस्फारून बघत राहिले.

केशवने आपल्याकडून फक्त हेडमास्तरांनाच ही गुप्त बातमी सांगितली होती. त्याला बिचाऱ्याला काय माहीत की तिथेच एका कोपऱ्यात मोहन मुर्गा होण्याची शिक्षा भोगत होता! मोहनने सगळे ऐकले, शिक्षा संपल्याबरोबर तो धावत पळत पळत वर्गात आला. सुट्टी व्हायला काही मिनिटेच बाकी होती. वर्गात मास्तर नव्हते. मुले आपली वह्या पुस्तके आवरायला लागली होती. मोहनने आल्या आल्या सगळ्यांना जमवले आणि आपल्याला कळलेली अतिशय गुप्त रहस्यमय गोष्ट सांगण्याच्या अविर्भावात चमकत्या डोळ्यांनी त्याने सगळ्यांकडे पाहिले आणि म्हणाला, "तुम्हाला माहित्ये, आज डाकबाबूंना कुणीतरी एवढा मोठ्ठा दगड पार्सलमधून पाठवलाय—ए ऽ व ढा," त्याने दोन्ही हातांनी दगडाचा आकार दाखवला. "एखाद्या फुटबॉल एवढा."



"आ ऽ?" सारी मुले थक्क झाली. एकाने विचारले, "तुला रे काय माहीत? तू तर मुर्गा बनला होतास."

मोहनने आपली कॉलर ताठ केली आणि म्हणाला, "अरे, मोहनला समजलास काय तू? आपण वाघाच्या सुद्धा गुहेतून कोकरू सोडवून आणू शकतो. सात गाठोड्यात बंद असलेलं रहस्य या मोहनला कळू शकतं. हे ऽऽ!"

मोहनची बातमी ऐकून सगळेजण चकित झाले. एका मुलाने हिंमत धरून विचारले, "हॅ ऽऽऽ! पार्सलमधून काय कुणी दगड पाठवतं? अरे तो बॉम्ब असेल बॉम्ब."

"हो रे हो, तो बॉम्बच असणार." सगळेजण इतकी घाबरून एकमेकांकडे बघायला लागली की जणू तो बॉम्ब आता फुटणारच आहे.

'ठण् ठण् ठण्' तेवढ्यात शाळा सुटल्याची घंटा झाली आणि सर्व मुले आपआपल्या वर्गातून बाहेर पडली. खूप पक्षी बसलेल्या एखाद्या झाडावर कोणीतरी दगड मारावा तसे दिसत होते ते दृश्य!

खरेतर रोज सुट्टी झाल्यावर मुले थेट घराकडे पळायची पण आज तहान भूक विसरून सारी पोस्टऑफिसकडे वळली.

डाकबाबू कामात व्यग्र होते. अचानक बाहेर गोंगाट करणारी एवढी मुलांची झुंड पाहून त्यांना आश्चर्यच वाटले. पुढचे हिशोब ठिशोब बाजूला मारून ते एकदम उभे राहिले आणि नाराजी दाखवत म्हणाले, "हे गर्दीचं मोहळ कुठून फुटलं एकदम? काय झालं रे? इथं कशाला गोळा झालात एवढे?"


मुले एकमेकांकडे टकामका बघत राहिली. शेवटी मोहनने धीर करून विचारले, "डाकबाबू, डाकबाबू, तुम्हाला पार्सलमधून काय आलंय?"

डाकबाबू थक्कच झाले. आता यांना कोणी सांगितलं? अर्थात त्यांच्या लक्षात यायला मुळीच वेळ लागला नाही. "हे कर्तृत्व केशवचंच! लोकाच्या पोटात एक गोष्ट टिकत नाही. साऱ्या गावभर वाण वाटून झालं असेल."

डाकबाबूंना गप्प उभे राहिलेले बघून मुलांची खात्रीच पटली. एक मुलगा एकदम ओरडला, "डाकबाबू, तो बॉम्ब असेल हं. फुटेल बिटेल!"

त्याबरोबर साऱ्यांनी इतकी वेगात धूम ठोकली की तो जणू बॉम्ब या क्षणी फुटणारच होता.

डाकबाबूच्या रागाला पारावार राहिला नाही. ते दरवाजातच तणतणत उभे राहिले, "येऊ दे तर खरं, आता त्या गुळाच्या गणपतीला. बघतोच त्याच्याकडे. साऱ्या गावभर कोकलत सुटतोय काय?"



## पाच

केशवचे खरेच तेच चालले होते. मग काय, व्हायचे तेच झाले. थोड्याच वेळात टपाल कचेरीत एका मागून एक माणसे जमा होऊ लागली.

सगळ्यात आधी आले हेडमास्तर. घाबरट आवाजात विचारू लागले, "डाकबाबू, काय ऐकतोय काय आम्ही?"

"काय?" मान वर करून डाकबाबूंनी पाहिले. "काय ऐकलंत तुम्ही?"

"अहो, डाकबाबू," हेडमास्तर काळजीच्या सुरात म्हणाले. "अहो आमच्या पासून कशाला लपवता? गावातल्या पोराटोरांना सुद्धा माहित्येय. काय आलंय तुम्हाला पार्सलमधून?"

पोराटोरांची गोष्ट तर डाकबाबूंनी हसून टाळली होती. पण आता हेडमास्तरांच्या तोंडून सुद्धा तेच ऐकल्यावर त्यांचे डोकेच फिरले. जरा रागावूनच ते हेडमास्तरांना म्हणाले, "छान, उद्या एखादा महामूर्ख येऊन सांगेल इथे अप्सरा येऊन नाचणार आहेत तर काय विश्वास ठेवाल त्यावर?"

"नाही, तसं नाही डाकबाबू," हेडमास्तरांनी काहीतरी बोलण्याचा प्रयत्न केला.

"तसं नाही तर कसं?" डाकबाबू भडकून म्हणाले, "कोण तो एक पोरगा, त्यानं थोडी गंमत केली काय अन् तुम्ही सगळ्यांनी कान टवकारलेत. जा, घरी जा आता तुम्ही."

पण या गोष्टीमुळे डाकबाबू आतून थोडे टरकलेच, केशव टपाल वाटता वाटता ही बातमी पण वाटत फिरला असणार हे त्यांच्या लक्षात आले. 'झालं, आता सारा गाव गोळा होईल इथं.' त्यांच्या मनात आले.

झालेही तसेच. हेडमास्तर जात नाहीत तोच लाला मुकुट बिहारी लंगडत आले आणि धापा टाकत चौकश्या करायला लागले, "डाकबाबू, डाकबाबू, काय म्हणताहेत गावातली माणसं? तुम्हाला म्हणे कोणीतरी पार्सलमधून बॉम्ब पाठवलाय!"

"अगदी खरं आहे, तुम्ही ऐकलेलं ते," डाकबाबू थोड्या उपरोधिक स्वरात म्हणाले. "बॉम्बच आहे—आणि थोड्याच वेळात फुटणार आहे. पहा हो तुमच्या जीवाला..."

"अरे बापरे!" लालाजी एवढे घाबरले की पुरते वाक्यही न ऐकता त्यांनी उलट्या पावली पळ काढला.

त्यांच्या नंतर कोणी ना कोणी येतच राहिले. कोणी म्हणाले, "डाकबाबू,





दिवस बरे नाहीत—काहीतरी करा लौकर.'' कोणी म्हणाले, ''डाकबाबू, अहो, कोणी जादूटोणा तर नसेल केला?'' कोणी विचारले, ''पोलिसात कळवलंत की नाही?''

त्यातं आणखी आठ दहा माणसांचा घोळका एकदम आला. त्यातच गावातले पुजारीबुवाही होते. त्या छोट्याशा कचेरीत एवढी माणसे कशी मावणार? बरेचसे बाहेरच गर्दी करून उभे राहिले. प्रत्येकाला एकच उत्कंठा होती, दगड पाठवला कुणी? दगड कसला आहे?

आता मात्र डाकबाबूंना बसल्याजागी हसू येऊ लागले. राईचा पर्वत कसा होतो याचा ते साक्षात अनुभव घेत होते. सगळ्यांची उत्सुकता शमविण्यासाठी शेवटी त्यांनी खणातून दगड काढला. टेबलावर ठेवला आणि म्हणाले, ''हा तो दगड. बघा नीट. हा बॉम्ब वाटतोय का?''

सगळे डोळे फाडफाडून बघत राहिले, ''हा कुठला बॉम्ब? छे! हा तर चक्क दगडच आहे. पण मग ही बॉम्बची अफवा पसरवली कुणी?''

पुजारीबुवा पुढे सरकले आणि म्हणाले, ''बघा हो, डाकबाबू, हा असा टेबलावर नका ठेवू. कोण जाणे कसला दगड आहे तो. काही वेडंवाकडं नको घडायला.''

''बरोबर आहे, बरोबर आहे,'' सगळे एका सुरात म्हणाले, ''पुजारीबुवा योग्यच सांगताहेत.''


''तो उचला आणि द्या फेकून,'' एकाने सांगितले.

पुजारीबुवा म्हणाले—''याला आपलं नदीच्या वाहत्या पाण्यात द्या सोडून.''

हे ऐकून डाकबाबूंना हसू आले. हसतच ते म्हणाले, ''हो, तेच तर करायला निघालो होतो, घाबरू नका. काही वेडंवाकडं घडणार नाही.''

''उगीच उशीर नका करू,'' आणखी कोणी बोलले. ''आधी वाहत्या पाण्यात सोडून या त्याला.''

असा उपदेश करून प्रत्येकाने आपली वाट धरली. डाकबाबू एकटेच स्वतःशी हसत राहिले, 'एका अफवेच्या पोटी किती बिनबुडाच्या गोष्टी रचतात हे लोक.' मग त्यांना एकदम केशवचाच राग आला. ते स्वतःशीच म्हणाले, ''आता येऊ दे तर खरं त्या भोजनभाऊला. बघतोच त्याच्याकडे.''



थोड्याच वेळात केशव आला. खरोखरच पार्सलबद्दल साऱ्या गावाला सांगत फिरत होता. आता मन खाऊ लागले म्हणून टपाल कचेरीत पाऊल टाकताना छातीत धडधडायला लागले.

डाकबाबू आपल्या कामात गर्क होते. अगडबंब देहाचा केशव दरवाज्यात आला आणि बाहेरून येणारा सारा प्रकाशच अडला. एकाएकी काळ्या ढगाने सूर्याला आच्छादून टाकावे तसे झाले.

डाकबाबूंनी मान वर करून पाहिले आणि ते उपहासाने म्हणाले, "यावं यावं, आलात मानाचे हारतुरे मिळवून? झाल्या दवंड्या पिटून?"

केशव गडबडला, गांगरून म्हणाला, "आपण नाही बुवा कोणाला काही सांगितलं—मी कशाला सांगू?"

"अच्छा? म्हणजे तू आता खोटंही बोलायला लागलास," डाकबाबू म्हणाले.

"नाही, नाही डाकबाबू, मी खरंच कोणाला नाही सांगितलं." आता मात्र डाकबाबू एकदम बिथरले. म्हणाले, "मग काय एवढी माणसं आकाशवाणी ऐकून आली होती का इथं? का सगळ्यांना तारा केल्या होत्या कोणी?"

केशवची बोलतीच बंद झाली. चाचरत, तोंडातल्या तोंडात तो बोलू लागला, "डाकबाबू, मी तर फक्त एवढंच बोललो की दगड आलाय. देवाशप्पथ!"

"तुझ्या पोटात काही कसं राहतं नाही?" डाकबाबू त्याच्या रडवेल्या चेहऱ्याकडे पाहत म्हणाले, "किती वेळा तुला समजावलं की तू एक सांगितलंस तर लोक त्याचे दहा करतात. तुझ्या हे लक्षात येत कसं नाही?"

केशव अगदी नरमला. मान खाली घालून म्हणाला, "आता पुन्हा नाही असं होणार, डाकबाबू मला माफ करा."

केशवपेक्षा कितीतरी पटीनी लोकांचा दोष होता हे डाकबाबूंना कळत होते. काही विचार न करता खुशाल हवेत वावड्या उडवून देतात. म्हणून ते केशवला आणखी काही बोलले नाहीत. त्याला सांगितले "चल, चल टपालाची गाडी [illegible] लवकर टपाल काढ आणि पत्राची विभागणी कर."





आपल्याला खूप पश्चात्ताप झालाय असा चेहरा करून केशव हळू हळू पुढे आला. गोष्ट या थराला जाईल असे त्याला मुळीच वाटले नव्हते. हळूच किल्ली उचलून तो बाहेर पडला.



खांबावर टपाल पेटी अडकवली होती. त्यात लोक पत्र टाकायचे. कुलूप उघडून त्याने सारे टपाल बाहेर काढले. आणि तिथेच उभा राहून तो पूर्वेकडच्या उंच शिखराकडे बघत राहिला. सापासारखी वळणे घेत येणाऱ्या रस्त्याचा खूप मोठा भाग तिथून दिसायचा. तिथून टपालगाडी येताना दिसेना तशी तो परत

येऊन आपल्या खुर्चीवर बसला. केवढे तरी काम पडले होते. साऱ्या पत्रांची विभागणी करायची होती. त्यांवर शिक्के मारायचे होते. त्याने पहिलेच पत्र उचलले अन् तो उचकलाच. त्या पाकिटावर पत्त्याच्या बाजूला तिकीट न लावता पाकिटाच्या उलट बाजूलाच डकवले होते. केशव लागला बडबडायला, "काय मूर्ख आहेत माणसं, स्टॅम्पसुद्धा नीट लावता येत नाही. काही अक्क्लच नाही. कुठंही आपला द्यायचा चिकटवून." असे म्हणता म्हणता ठाक्‌कन् त्याने जोरात शिक्का मारला.

"ए ऽ केशव, अरे काय शिक्के मारतो आहेस की धडाड धडाड बॉम्बगोळे सोडतो आहेस?" शिक्क्याचा आवाज ऐकून डाकबाबू म्हणाले—"आणि बडबड काय चाललीय स्वतःशीच? चल आटप लौकर. टपाल गाडीची वेळ झाली."

केशव ठकाठक शिक्के मारू लागला. झटक्यात त्याने सारे काम संपविले. टपाल गाडी आली आणि टपालाची थैली घेऊन गेली.

कचेरी बंद करण्याची वेळ झाली. आपले काम आवरून केशव जायची तयारी करू लागला. डाकबाबू आपल्या कामात गर्क होते.

केशव उठला आणि हलक्या पावलांनी डाकबाबूंच्या टेबलाजवळ आला आणि अगदी लहान मुलासारखा चेहरा फुगवून म्हणाला, "डाकबाबू, मला क्षमा करा. मी पुन्हा अशी चूक करणार नाही."

डाकबाबूंना त्याची कणव आली. त्याला समजावत ते म्हणाले, "अरे, काही गोष्टी पोटात ठेवाव्या, बरं जा—जा. माफ केलं तुला." केशवचा चेहरा खुलला—म्हणाला, "खरंच माफ केलंत ना?"

"आता काय पावती लिहून देऊ?"

केशवने खूष होऊन डाकबाबूंना सलाम ठोकला, "जयहिंद सर."

## सात

घरी जायच्या आधी नदीच्या काठी जायचे आणि दगड तिथे ठेवून यायचे असे डाकबाबूंनी पक्के ठरवले.

संध्याकाळच्या सावल्या पसरू लागल्या. डाकबाबू उठून उभे राहिले. चिठ्ठी नीट कोटाच्या आतल्या खिशात ठेवली. दगड कोटाच्या बाहेरच्या खिशात ठेवला. छत्री घेतली आणि कचेरी बंद करून ते निघाले.

भजीवाल्या नथूच्या टपरीसमोर एक बस उभी होती. टपरीभोवती प्रवाशांची गर्दी झाली होती. अन् नथू दोन्ही दोन्ही हातांनी गल्ला गोळा करीत होता.

हे एक बरे झाले. नथू रिकामा असता तर डाकबाबूंना अडवून त्याने पार्सलबद्दल नक्की चौकश्या केल्या असत्या. डाकबाबू हळूच नदीकडे सटकले. नदी काही फार दूर नव्हती. सुरेशने बरोब्बर वर्णन.केले होते. नदीच्या काठावर खरेच दोन मोठ्या शिळा जवळ जवळ खड्या होत्या. डाकबाबूंनी जवळ जाऊन पाहिले. त्या दोन्ही शिळांच्या मध्ये खाली खूप असेच लहान, मोठे, गोल, चपटे दगड पडले होते.

डाकबाबूंनी खिशातून दगड काढला. तो हातात धरून ते विचार करत पाहिले, राहून राहून एकच गोष्ट त्यांच्या मनात येत होती, 'कोण हा मुलगा? तो माझ्याकडूनच हे सगळं का करून घेतोय? मीही कठपुतळीप्रमाणे त्याच्या

पुणे महानगरपालिक
गरवारे बालभव
पुणे



इच्छेनुसार इथं का आलो? त्या पोराच्या डोक्यात कोणीतरी हे खूळ घातलं असेल. पण मी सुद्धा—'

काळोख दाटू लागला होता. डाकबाबूंनी हातातल्या दगडाकडे एकदा न्याहाळून पाहिले, अन् मग हळूच वाकून तो खाली ठेवून दिला.

दगड खाली ठेवला नाही तोच एक विचित्र गोष्ट घडली. अनेक छोटी छोटी मुले आनंदाने खिदळताहेत असा आवाज कानावर आला.

डाकबाबूंच्या काळजाचा ठोका चुकला. पण डोके शाबूत होते. स्तब्ध उभे राहून ते बघत होते. बघता बघता हसण्याचा आवाज बंद झाला. एकदम सन्नाटा पसरला. त्या शांततेत नदीचा प्रवाह सुद्धा वाहायचा जणू थांबला होता. आसपासच्या मोठमोठ्या झाडांची सळसळ सुद्धा थांबली होती.

डाकबाबू आ वासून बघतच राहिले. छोट्या छोट्या मुलांना कोणीतरी गुदगुल्या केल्यावर ती जशी खिदळतात तसा आवाज होता तो. हे काय गौडबंगाल आहे?

डाकबाबूंचा जादूटोण्यावर मुळीच विश्वास नव्हता. पण ही गोष्ट तर जादूटोण्यापेक्षाही अद्‌भुत होती. डाकबाबू तसेच उभ्या उभ्या विचार करू



लागले, 'हा माझ्याच कल्पनेचा खेळ नाही ना? छे, छे! आपण आपल्या कानांनी मुलांचं खिदळणं ऐकलंय, आपले कान आपल्याला धोका कसा देतील?'

डाकबाबू हालचाल करण्याचे जणू विसरून स्तब्ध उभे होते. त्यांचा पाय. उचललाच जात नव्हता. जणू काही खालून कुणीतरी त्यांचे पाय जखडून ठेवले आहेत असे वाटत होते. एकदम वाऱ्याच्या झुळुकेने आणि नदीच्या खळखळाटाने ते भानावर आले. पुन्हा विचारात बुडाले—'कमाल आहे! माझ्यावरच काही जादूटोणा झाला की काय?'

याच विचारांच्या उलाघालीत ते थोडावेळ तेथेच उभे राहिले. आता पूर्ण काळोख झाला होता. म्हणून ते चुपचाप वळले आणि माघारी घराकडे निघाले.

बस निघून गेली होती. भजीवाला नथू पेट्रोमॅक्सच्या प्रकाशात दिवसभराचा गल्ला मोजत होता. डाकबाबू त्याला टाळून निसटायला बघत होते. पण नथूने त्यांना पाहिलेच. वर बघून तो म्हणाला, "डाकबाबू, थोडी गरम गरम भजी तरी घेऊन जा, आत्ताच काढली आहेत."

पण डाकबाबूंनी नकार दिला. त्यावर नथू एकदम म्हणाला, "डाकबाबू, सगळी माणसं काय म्हणताहेत?"

"हेच ना, मला पार्सलातून एक दगड आलाय?" डाकबाबू सट्कन बोलले. "म्हणशील तर देतो तुला. बेसनात घालून तळशील?"

नथूचे बोलणे खुंटले. त्याला त्याच अवस्थेत सोडून डाकबाबू पुढे निघाले.

घराजवळ एक माणूस दिसला. डाकबाबू दिसल्याबरोबर भराभरा चालत तो पुढे आला. तो का आला आहे हे डाकबाबूंनी ओळखलेच होते. त्याने काही विचारण्यापूर्वीच डाकबाबूंनी सांगून टाकले, "बाबा रे, तुझं काही पत्र बित्र नाही आलं."

असे म्हणून ते भराभर घराच्या बाजूला वळले. एकीकडे तोंडाने बडबडत होते "पत्र, पत्र...! गावातल्या प्रत्येक रामा शिवा गोविंदाला रोजच्या रोज पत्र मिळायला पाहिजे. जणू पत्र वाचल्याशिवाय जेवण जाणार नाही."

# आठ

डाकबाबू घरी एकटेच राहत. त्यांना ना मूल ना बाळ. सकाळ संध्याकाळ स्वतःच आपले जेवण बनवायचे. पण आज त्यांची तहानभूक मेली होती. पार्सलमध्ये आलेला दगड पाहून सुद्धा ते एवढे घाबरले नव्हते. पण आत्ता आत्ता नदीकाठी जे काही घडले त्यामुळे ते पुरे हैराण झाले होते.

दिवा लावून त्यांनी छत्री एका बाजूला ठेवली. कोट काढून खिळ्याला अडकवला आणि खुर्चीवर अंग टाकून ते पुन्हा साऱ्या गोष्टींचा संगतवार विचार करू लागले.

'घडले ते सारे गूढच होते. दगड खाली ठेवल्याबरोबर जणू कोणी टेपरेकॉर्डर चालू करावा तशी खिदळण्याची टेपच जणू वाजायला लागली. मलाच काही भ्रम तर नाही झाला? का खरंच नदीकाठी मुलांच्या खिदळण्याचा आवाज ऐकू आला? एकमेकांपासून विलग झालेली मंडळी अचानक भेटल्यावर जसे आनंदाने हसतील, खिदळतील तसा आवाज, असं अद्भुत कसं घडलं? का माझ्या कानांनीच मला दगा दिलाय? छे, छे! मी माझ्या कानांनी अगदी स्पष्ट ऐकलंय ते खिदळणं.'

डाकबाबूंना हे कोडे सुटत नव्हते. रुमालाने चेहऱ्यावरचा घाम पुसता पुसता एकदम त्यांच्या डोक्यात एक कल्पना आली. 'पत्र लिहिणारा हा पोरगा, सुरेश



मोठा हुशार दिसतोय. त्यालाच पत्र लिहून सारा उलगडा का नाही करून घेऊ? की बाबा, ही काय भानगड आहे? तू हा दगड माझ्याकडेच का पाठवलास? त्यात आणि हे खिदळणं—हा प्रकार तरी काय आहे?'

खिदळण्याच्या आवाजाचे कोडे तर डाकबाबूंना उलगडतच नव्हते. ‘बास, असंच करावं’ त्यांनी निर्णय घेतला, ‘सुरेशला पत्र लिहून त्यालाच विचारावं सारं.’

आणि टेबलाचा खण उघडून त्यांनी एक आंतर्देशीय पत्र बाहेर काढले. लिहायला बसले. खूप विचार करकरून त्यांनी सुरेशला हे पत्र लिहिले.

*प्रिय सुरेश,*

*मी तुला ओळखत नाही. असले हे अद्‌भुत्‌ पार्सल मला पाठविण्याचा तुझा हेतू तरी काय? तुझे मन राखण्यासाठी आणि गावातल्या शंकेखोर लोकांच्या मनातला संशय दूर करण्यासाठी मी तो दगड नदीकाठच्या त्या जागेवर थोड्या वेळापूर्वीच ठेवून आलो.*

*पण तिथे एक अतर्क्य गोष्ट घडली. मी दगड खाली ठेवला मात्र एकदम खूप खूप मुलांच्या एकत्र खिदळण्याचा आवाज माझ्या कानावर आला. हा मला झालेला भास किंवा माझा कल्पनाविलास मुळीच नाही. अगदी खरोखरी घडलेली सत्य घटना आहे ही. मी माझ्या कानांनी ते खिदळणे ऐकलेय, आत्ता पत्र लिहिताना सुद्धा तो आवाज माझ्या कानी गुंजतो आहे.*

*म्हणून आता तुलाच विचारतोय, की बाबा, ही भानगड तरी काय आहे? मी अंधश्रद्ध नाही—जादूटोण्यावर माझा अजिबात विश्वास नाही. माझी खात्री आहे की तू माझ्यापासून काही लपविणार नाहीस. खरं खरं काय ते सांगशील? मी तुझ्या पत्राची वाट पाहतो आहे.*


*तुझा,*<br>
*रामधन*<br>
*सब-पोस्टमास्तर*

पूर्ण पत्र त्यांनी दोन तीनदा वाचले, एक दोन ठिकाणी खाडाखोड करून पुन्हा लिहिले—‘हो—पोराला सारं स्पष्ट कळलं पाहिजे.’ मग आंतर्देशीय पत्र



बंद केले. उठून उभे राहिले. खरेतर दिवसभर ते दमले होते. तरी सुद्धा टपालपेटीत पत्र टाकायला निघाले. टपाल सकाळीच जाणार होते. टपाल काढणारे आणि पाठवणारे तेच होते. टपालपेटीची किल्ली त्यांच्याच जवळ असायची. तरी सुद्धा ते पत्र या क्षणी टपालपेटीत टाकल्यशिवाय त्यांना स्वस्थता लाभली नसती.

बाहेर धुके पडले होते. थोड्या वेळात पाऊस पडणार अशी लक्षणे दिसत होती. भराभर चालत ते टपाल कचेरीजवळ आले. एक कुत्रा थंडीपासून बचाव करण्यासाठी एका कोपऱ्यात बसला होता. तो एकदम भुंकत आला. डाकबाबूंनी जोरात पाय आपटत त्याला पळवून लावले आणि पुढे होऊन पत्र पेटीत टाकले. खट्‌कन पत्र आत पडले आणि जणू ते सुरेशपर्यंत पोचलेच असे डाकबाबूंना वाटले. हे सगळे करून त्याच पावली ते घरी परतले.



# नऊ

दुसऱ्या दिवशी डाकबाबू तयार होऊन कचेरीत जाण्यासाठी घरून निघाले. रस्त्यावर येतात तोच ज्याची भीती वाटत होती तसेच घडले. लोकांनी दगडाच्या बाबतीत चौकश्या करून करून त्यांच्या नाकी नऊ आणले.

सगळ्यात आधी गाठ पडली पंसारी गोविंदशी. तो म्हणाला, ''डाकबाबू, आपण तर हैराणच झालो ऐकलं तेव्हा.''

पंसारीचे बोलणे ऐकले न ऐकलेसे करून डाकबाबू पुढे चालू लागले. समोरून लाला मुकुट बिहारी लंगडत लंगडत येत होते. डाकबाबूंना बघून ते थांबलेच. म्हणाले, ''मग त्या दगडाचं काय केलंत, डाकबाबू? फेकला नसेल तर फेकून द्या बरं लगेच. उगीच उशीर करू नका. असल्या गोष्टी घरात ठेवणं बरं नाही.''

पुढे पुजारीबुवांनी हेच सांगितले. म्हणाले, ''डाकबाबू, जी गोष्ट हिताची नसते ती फेकूनच द्यायला हवी. तो दगड नदीत सोडून आलात हे मात्र तुम्ही छान केलंत, सगळ्यांवरचंच अरिष्ट गेलं.''

जितकी तोंडं, तितके सल्ले.

कोणी म्हणाले, ''डाकबाबू, एक चुकलंच तुमचं. अहो, ही पार्सलची गोष्ट पोलिसांवर सोपवायची. तुमची डोकेदुखी वाचली असती.''



कोणी म्हणाले, ''हा काहीतरी जादूटोण्याचाच प्रकार आहे. अहो, अशा गोष्टी नेहमी घडतात आजकाल.''

कोणी म्हणाले, ''पण तुम्ही त्या मुलाचा पत्ता काढा बुवा आणि पोलिसात कळवा. चांगली अद्दल घडवा लेकाच्याला.''

डाकबाबू शाळेवरून जाऊ लागले तसे सगळ्या पोरांनी त्यांना पाहिले. आणि झाले! सगळे एका सुरात एका हिंदी सिनेमातले गाणे गाऊ लागले.

''कोई पत्थर से न मारे, मेरे दीवाने को...''

मुलांचे हे चिडवणे बघून त्याही स्थितीत डाकबाबूंना हसू आले.

टपाल कचेरीत पोचले तर केशवचा अजूनही पत्ता नव्हता. डाकबाबूंना बिचाऱ्यांना स्वतःच कुलूप उघडावे लागले. ''काय माणूस आहे हा केशव? सदा सुस्त पडलेला असतो. आळशी लेकाचा, आता येत असेल मुंगीच्या पावलांनी. नाहीतर बसला असेल कुठेतरी गप्पा हाणत.''

डाकबाबू आत शिरतात तोच केशव आला. जोरजोरात धापा टाकत होता. आल्या आल्या माफी मागायला लागला. "सर, थोडा उशीर झाला."

डाकबाबू म्हणाले, "हो, रात्री नगारा फुटेपर्यंत खाल्लं असशील, मग सकाळी वेळेवर डोळे कसले उघडतात? आता नुस्ता बघत काय उभा राहिला आहेस? जा आधी, टपाल काढ लौकर आणि इथं माझ्यासमोर शिक्के मार."

हे ऐकून केशवच्या तोंडचे पाणीच पळाले. गेले काही दिवस लोकांची तक्रार चालली होती, की आमची पत्रे पोचत नाहीत. कोणीतरी पत्रावरची तिकिटेच काढून घेत असले पाहिजे. कुणीतरी त्यात हळूच केशवचे नावही घेतले होते. म्हणून डाकबाबू असे म्हणताच केशव एकदम घाबरला. त्याच्या मनात आले, 'डाकबाबूंनाही आपला संशय येत नसेल ना? आपण तर बुवा कधी तिकिटं बिकिटं चोरली नाहीत.'

हे अगदी खरे होते. डाकबाबूंनाही ते चांगले माहीत होते. केशव मूर्ख होता. वागण्यात एकदम ढिला होता. पण चोर मुळीच नव्हता. डाकबाबूंनी केशवचा उतरलेला चेहरा पाहिला आणि दरडावून म्हणाले, "आता काय झालं? चेहरा का वाकडा? जा लौकर, टपाल काढून आण."

केशवने गुपचूप किल्ली उचलली, आणि पेटीतून पत्रे काढून घेऊन आला आणि अतिशय काळजीपूर्वक आपल्या तीन पायांच्या खुर्चीवर बसला. डाकबाबू उठले आणि केशवच्या टेबलाजवळ येऊन उभे राहिले.


आता तर केशवचे धाबेच दणाणले. मान वर करून त्यांच्याकडे बघत राहिला आणि मग अतिशय दीनवाणा होऊन म्हणाला, "डाकबाबू, मी खरं सांगतो मी निर्दोष आहे. मी काही सुद्धा केलं नाही."

डाकबाबू बुचकळ्यात पडले की हे काय बडबडतोय हा! सुन्न होऊन म्हणाले, "अरे, तुझं डोकं आहे का खोकं रे? तोंडाला येईल ते बोलत असतोस, चल, काम सुरू कर."

वास्तविक डाकबाबूंचा केशवजवळ येऊन उभे राहण्याचा उद्देश काही

वेगळाच होता. सुरेशच्या पत्रावर आपल्यासमोर शिक्का मारला जावा एवढीच त्यांची इच्छा होती.

एकेक पत्र घेऊन केशव त्यावर ठकाठक शिक्के मारू लागला. डाकबाबू एकटक बघत होते. शेवटी एकदा सुरेशच्या पत्राची पाळी आली. ठक्कन केशवने त्यावर शिक्का मारला, तेव्हा कुठे डाकबाबूंच्या जीवाला स्वस्थता मिळाली. जणू पत्र नीट सुरेशला पोचलेच असे वाटले. रुमालाने डोक्याचा घाम पुसता पुसता ''चल भराभर काम उरक, उशीर होतोय,'' असे केशवला सांगून ते आपल्या जागेवर येऊन बसले.




# दहा

आता डाकबाबू रोज सुरेशच्या पत्राची वाट पाहू लागले. त्यांना माहीत होते, पत्र पोचायला खूप दिवस लागतात. उत्तर यायलाही खूप दिवस लागतात. तरीही अतिशय अधीरतेने ते रोजची डाक पाहायचे आणि सुरेशचे पत्र नाही म्हणून उदास व्हायचे.

कधी कधी विचार करत बसायचे, 'सुरेश उत्तर देईल का नाही, कुणास ठाऊक! उत्तर द्यायचं म्हटलं तरी काय देणार? काय ठाऊक सुरेश कशाप्रकारचा मुलगा आहे! उगीच गंमत म्हणून तर त्यानं पार्सल पाठवलं नसेल? असं तर नाही होणार की आपलं पत्र वाचून आणखी चेष्टेने तो हसत असेल किंवा शाळेतल्या मुलांना माझं पत्र दाखवून दाखवून माझी टिंगल तर करत नसेल? की बघा, बघा त्या डाकबाबूंना कसं मामा बनवलं!'

अशा उलाघालीत आठ दहा दिवस उलटले. आता डाकबाबू सगळी आशा सोडून बसले होते. त्यांची खात्रीच पटली की दिल्लीच्या कोणी मुलाने आपली चांगलीच गंमत केली आहे. उत्तर यायचे असते तर आत्तापर्यंत आलेच असते.

जेव्हा डाकबाबू इतके निराश झाले होते तेव्हा एक दिवस अचानक सुरेशचे पत्र आले. कापऱ्या हातांनी त्यांनी ते आंतर्देशीय पत्र उघडले. एका नजरेत



वरपासून खालपर्यंत वाचून काढले. ते जसजसे पत्र वाचू लागले तसतसे त्यांचे मन आनंदाने भरू लागले.

सुरेशने मोठ्या आदरभावाने पत्र लिहिले होते आणि डाकबाबू सद्‌गदित होऊन वाचत होते.

*आदरणीय डाकबाबू,*

*नमस्कार!*

*मी कोणत्या शब्दात आपले आभार मानू तेच मला कळत नाही. आपण*

माझं काम करून माझ्यावर मोठे उपकार केले आहेत. आता या दगडाबद्दल, मी हा दगड आपल्याकडे का पाठवला याबद्दल सारे काही सांगतो.

मनालीहून येता येता आम्ही सगळे आपल्या गावात थोडा वेळ थांबलो होतो. तिथे आमची कार बिघडली होती. पपा कारची दुरुस्ती करत होते. तेव्हा मी व्यास नदीच्या काठावर एक चक्कर टाकली आणि व्वा! तिथला रमणीय देखावा पाहून अगदी मोहून गेलो. खळखळ वाहणारे नदीचे पाणी. किती स्वच्छ आणि शुभ्र! भोवतालची गर्द झाडी हिरवागार रंग उधळीत होती. पण सगळ्यात माझं लक्ष ओढून घेतलं त्या शिळांमधल्या आकर्षक दगडांनी. काही गोल, काही चपट्या, तऱ्हेतऱ्हेच्या आकार प्रकारांच्या त्या सुंदर दगडांनी. मला मोह पडला आणि मी एक दगड उचलला.

पण दिल्लीला आल्यावर एक विचित्रच गोष्ट घडली. असं काही घडू शकतं यावर कोणी विश्वास सुद्धा ठेवणार नाही.

तो दगड मी माझ्या खोलीत टेबलावर ठेवला होता. एका रात्री मी गाढ झोपलो असताना मला खोलीत काहीतरी आवाज ऐकू आला आणि माझी झोप मोडली. माझ्या खोलीत बसून कोणीतरी हुंदके देत आहे असं वाटलं.

मी तर घाबरलोच, हा काय प्रकार आहे—मी अंधारात डोळे फाडफाडून बघत राहिलो. वर पंखा फिरत होता. पहिल्यांदा असंच वाटलं की आपल्याला काहीतरी भास होतोय. किंवा स्वप्न पाहतानाच आपण जागे झालो असू. पण नाही, तो भास नव्हता. खरंच कोणीतरी माझ्या खोलीत होतं आणि हुंदके देऊन रडत होतं.

माझी तर भीतीने गाळण उडाली. पण धीर करून जवळच असलेल्या टेबल लॅम्पचं बटण मी दाबलं. साऱ्या खोलीत प्रकाश पसरला. मी इकडे तिकडे पाहिलं. कोणी कुठे दिसलं नाही. अन् एकाएकी माझी नजर टेबलावर पडली. असं वाटलं की टेबलावरचा तो दगड डोलतोय आणि त्यातूनच आवाज येतोय.

हे पाहून माझा भीतीने थरकाप झाला. मी हे अद्भुत दृश्य आपल्या



डोळ्यांनी पाहिलंय यावर कोण विश्वास ठेवील? अन्.अचानक माझ्या कानावर एक आवाज आला.

"मला का आणलंस इथं? मला परत जायचंय, तिथे माझी भावंडं आहेत. मित्र आहेत. सगेसोयरे आहेत. आम्ही कसे छान मिळून मिसळून राहायचो तिथं! उन्हाळ्यात, पावसाळ्यात एकमेकांना साथ द्यायचो, त्यांच्यांशिवाय मला

नाही करमत, दुःख होतंय. तिकडे तेही बिचारे माझी काळजी करत असतील. इथं मी त्यांच्याशिवाय तळमळतोय. काही करून मला परत तिथं सोडून दे. मला तिथं सोडून दे—सोडून दे.'' पुन्हः पुन्हा 'सोडून ये—सोडून ये' हाच आवाज गुंजत राहिला.

मी भूल पडल्यासारखा बघत राहिलो. असं काही होऊ शकेल यावर कोणीसुद्धा विश्वास ठेवणार नाही.

एकदा वाटलं घरातल्या सगळ्यांना उठवावं. पण धीर नाही झाला. वाटलं कोण विश्वास ठेवील? उलट माझंच डोकं फिरलंय म्हणायचे. माझीच चेष्टा करायचे. तेवढ्यात शेजारच्या खोलीतून आईची हाक आली, ''सुरेश, कितीवेळ दिवा जळतोय तुझा? काय चाललंय?'' मी घाबरलो. झट्‌कन सबब सुचली. म्हणालो, ''काही नाही आई, पाणी प्यायला उठलो होतो.''

''बरं, झोप आता. अजून खूप रात्र बाकी आहे,'' ती झोपाळलेल्या आवाजात म्हणाली.

मी काही क्षण त्या दगडाकडे एकटक बघत राहिलो. आता तो हालत नव्हता, डोलत नव्हता. पुन्हा मला शंका आली की मघाशी झालेला भासच तर नसेल? किंवा माझ्याच डोक्यातली काहीतरी कल्पना तर नसेल? पण नाही, मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी त्याला हालता डुलताना पाहिलं होतं. आपल्या कानांनी त्याचं बोलणं ऐकलं होतं.

काही वेळ मी तसाच उभा राहिलो. मग येऊन पलंगावर पडलो. दिवा मालवला. पण अशा स्थितीत झोप कशी येणार? पुन्हा पुन्हा तो आवाजच माझ्या कानात गुंजत होता आणि बस्स! मी निर्णय घेतला—लौकरात लौकर तो दगड परत पाठवायचा. आपण विश्वास ठेवा, या निश्चयानंतर माझं मन अगदी शांत झालं.

दुसऱ्या दिवशी याच विषयावर विचार करत राहिलो. एवढ्या दूर हा दगड पाठवावा कसा? आणि कोणाकडे पाठवावा? मला काहीच करणं शक्य नव्हतं

*आणि एकदम मला आपली, म्हणजे आपल्या टपाल कचेरीची आठवण झाली. आपली टपाल कचेरी आमच्या नजरेस पडली होती. बस, मग ठरवलं की दगड पार्सल करून आपल्याकडे पाठवावा आणि आपल्यालाच विनंती करावी की याला नदीकाठी ठेवून यावं म्हणून.*


*बस, झालं ते असं, एवढंच!*

*आपण कृपाळूपणे माझं एवढं काम केलंत त्याबद्दल मनापासून आभारी आहे. आपल्याला पुन्हः पुन्हा धन्यवाद! आम्ही पुन्हा कधी त्या बाजूला आलो तर जरूर आपली भेट घेऊ.*

*आपला नम्र,*
*सुरेश*

पत्राखाली ताजा कलम होता.

*आपल्या गावी रस्त्यावर एक भजीवाला बसतो. तो अतिशय घाणेरडं तेल वापरतो. आम्ही त्याची भजी खाल्ली आणि रस्त्यातच सगळ्यांचे घसे खराब झाले. आल्या आल्या सगळ्यांना औषधं घ्यावी लागली. असल्या दुकानदाराला आपल्या गावात बसू का देता?*



## अकरा


या पत्राने डाकबाबूंच्या साऱ्या शंका फिटल्या. बसल्या बसल्या ते आता छान गालातल्या गालात हसत होते. केशव पोस्टमन आपल्या तीन पायांच्या खुर्चीवर बसून डोळ्यांच्या कोपऱ्यातून हळूच बघत होता. डाकबाबूंना हसताना पाहून त्याचाही चेहरा खुलला.

तेवढ्यात डाकबाबूंना रस्त्यावरून जाणारा बलराम दिसला. त्याला पाहताच त्यांना आठवले की त्याच्या भावाची मनीऑर्डर आलीय. मनीऑर्डरच्या गठ्ठ्यातून चट्‌कन त्याची मनीऑर्डर काढून ते दरवाजापाशी आले. आणि त्यांनी बलरामला हाक दिली, "ए ऽ इकडे ये."

डाकबाबूंचा आवाज ऐकून बलरामच्या पोटात गोळाच उठला. तो पुतळ्या सारखा उभा राहून बघतच राहिला.

"अरे इकडे ये," डाकबाबूंनी फटकारले. "एवढा डोळे फाडून बघतोस काय? तुला लुटायला आलेला मी कोणी डाकू आहे का? अरे मी डाकबाबू आहे. तुझी मनीऑर्डर आलीय."

"खरंच?" बलरामचा चेहरा उजळला. त्याला आनंद झालेला पाहून डाकबाबूंच्या मनातही प्रसन्नता भरून आली. असं आहे! कोणाला आनंद दिला की अशा तऱ्हेने आपल्यालाही आनंद मिळतो.



मोठ्या प्रेमाने त्याला खोटे खोटे रागवत डाकबाबू म्हणाले, ''खरं नाही तर कायं खोटं सांगतोय? ही बघ.''

डाकबाबूंनी मनीऑर्डरच दाखवली, बलरामचा विश्वास बसत नव्हता. पण आता हातच्या कांकणाला आरसा कशाला? मनीऑर्डर तर डाकबाबूंच्या हातातच होती.

''जा बापाला घेऊन ये तुझ्या,'' डाकबाबूंनी सांगितले. बलरामला जणू काही पिसासारखे आपण तरंगतोय असे वाटत होते. मग एकदम ''आत्ता येतो, आत्ता येतो,'' असे म्हणत त्याने धूम ठोकली.

Lasertypeset at Ess Ess Enterprises, New Delhi-110 055
and printed at Juputer Offset Works, Delhi-110 032



एकः सूते सकलम्

रु. 13.00 ISBN 81-237-3533-2

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया